महाराष्ट्र शासन

क्रमांक: टीईसी १९८४/
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक : २१ जून १९८४.

प्रति,

सचिव,
श्री रामदेवबाबा स्मारक सार्वजनिक समिती,
नागपूर.

विषय :- अशासकीय संस्थांना विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता...

महोदय,

अभियांत्रिकी/तंत्रशास्त्रामध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासंबंधीच्या आपल्या अर्जासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी आपल्या संस्थेस खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे :-

(अ) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: टिइएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१, (अ), दिनांक २९ मे, १९८३ अन्वये अशा संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास मान्य असतील (सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.)

(ब) सुरु करावयाचे पदवी अभ्यासक्रम तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेऊन निश्चित केले जातील.

(क) नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ कलम ४३ अन्वये सदर महाविद्यालयाचे नागपूर विद्यापीठाशी संलग्नीकरण करण्यासाठी संस्थेने अर्ज केलेला असावा.

(ड) वरील (अ) व (ब) मध्ये अंतर्भूत असणारी कागदपत्रे औपचारिक बाबी या संस्थेद्वारे तंत्र शिक्षण संचालकांच्या सहमतीने, समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात येतील व त्या नंतरच अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अंतिम परवानगी व दिनांक तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून देण्यात येईल.

(इ) संस्थेने तयार केलेला प्रकल्प अहवाल हा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या पश्चिम विभागीय समितीने स्वीकारलेला असावा व त्यास परिषदेची अंतिम स्वीकृती असावी, अशी स्वीकृती न मिळाल्यास महाविद्यालय बंद करावे लागेल.

....२

५. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण त्वरीत तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच आपणास सूचित करण्यात येते की, तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई व नागपूर विद्यापीठ यांनी लेखी स्वरुपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय आपण अभ्यासक्रमास प्रवेश देऊन सुरुवात करु नये.

आपला विश्वासू,

( शि. वि. देउस्कर )

~~[illegible]~~ सचिव, महाराष्ट्र शासन.

अवर